# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक - ३९६/२०२४ दिनांक २५/११/२०२४

## प्रेस नोट

### “लिफ्ट देण्याच्या बहाण्याने प्रवाश्यांना लुटणा-या आरोपीतांना अवघ्या २४ तासात अटक करण्यात विरार पोलीस ठाणेस यश.!!”

दिनांक २०/१०/२०२४ रोजी पहाटे ०३.३० वा. ते ०४.०० वा. चे दरम्यान ०४ अनोळखी इसमांनी तक्रारदार यांना विरार रेल्वे स्टेशन येथे सोडण्याच्या बहाण्याने लिफ्ट देऊन इर्टिगा कारमधे बसवुन (नंबर माहीत नाही) त्यांना चाकुचा धाक दाखवुन चाकुने उजव्या हातावर व डोक्यावर मारहाण करुन मोबाईल फोन, पाकीट व त्यामधील ५०० रुपये तसेच ब्लुटुथ अशी मालमत्ता जबरीने काढुन घेवुन पळुन गेले आहेत. सदरबाबत **विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ७५०.२०२४ भारतीय न्याय संहिता-२०२३ चे कलम ३०९(६), ३(५) प्रमाणे** गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे जबरी चोरी सारख्या गुन्हयाचे गांर्भिर्य लक्षात घेऊन गुन्हे प्रकटीकरण पथकाने गुन्हयाचा तपास सुरु करुन पडताळणी केलेल्या सि.सि.टि.व्ही फुटेज मध्ये तक्रारदार यांना लुटणा-या इर्टिगा कारच्या मागील बाजुस एक लोगो दिसुन आला. सदर लोगोचा सि.सि.टि.व्ही. कॅमेरामार्फत मागोवा घेत असतांना, सदरचा लोगो मानवी हक्क परीषद असा असल्याचे धानीवबाग नालासोपारा-पुर्व येथे निष्पन्न झाला. धानिवबाग येथे गुप्त बातमीदारामार्फत नमुद कार व त्यावरील लोगो बाबत माहीती घेतली असता, सदरची कार श्री. गुफरान खान रा. धानीव बाग, नालासोपारा पुर्व यांच्या मालकीची असल्याचे समोर आली. त्याअनुषंगाने गुफरान खान यांना विचारपुस केली असता, कार मालक यांनी सदर कार अशरफ मोहमद इशाहक रंगरेझा रा. रुम नं.बी/२०१ अमनदीप अपार्टमेंट, दुबे स्कुल जवळ, बिलालपाडा, नालासोपारा पुर्व यास चालविण्यास दिल्याचे समोर आले. त्याअनुषंगाने अशरफ इशाहक यास बोरीवली येथुन ताब्यात घेतले असता, त्याने गुन्ह्याची कबुली देऊन त्याचे गुन्हयातील इतर साथिदार २) अलीनजिर अहमद खान, वय २२ वर्ष, ३) रवीकुमार देवनारायण गौतम, वय २६ वर्ष, ४) आकाश राकेशकुमार मोदनवाल, वय २२ वर्ष, आरोपी क्र. २ ते ४ रा. गाळा नं. ६, उपाध्याय चाळ, डोंगरपाडा रोड, दुबे स्कुल जवळ, बिलालपाडा, नालासोपारा पुर्व यांना ताब्यात घेऊन गुन्हयात अटक केलेली आहे. आरोपीतांनी जबरी चोरी केलेली गुन्हयातील १०० टक्के मालमत्ता व गुन्हा करतांना वापरलेली इर्टिगा कार हस्तगत करण्यात आलेले आहेत.

नमुद गुन्हयाचा तपास मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे विरार पोलीस ठाणे गुन्हे

प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार तसेच तपासी अधिकारी यांनी अथक परिश्रम घेऊन गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-३, श्री.बजरंग देसाई, सहा पोलीस आयुक्त, विरार विभाग, श्री. विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. सुशीलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, सपोनि, स्वप्नील कदम, पोउपनिरी/अविनाश हाटखिळे, पोहवा/सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे तसेच पोअं/मोहसीन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, प्रफुल सोनार, संदिप शेळके, सोमनाथ घनवट यांनी सदरची कामगिरी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

-----ooo-----